(68) C/ATT/11/08/03

**अधिकारी/कर्मचारी यांच्या कार्यालयीन उपस्थितीची तपासणी करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

महसूल व वन विभाग,

शासन परिपत्रक क्र.ओएफएम १०/०८/प्र.क्र.४५२/ई.

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,

दिनांक : २६ नोव्हेंबर, २००८

**पहा:** १) शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग समक्रमांक दिनांक १८ ऑगस्ट, २००८

२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.अहत १६०८/प्र.क्र.४७/०८/११-अ, दिनांक ३ नोव्हेंबर, २००८.

**परिपत्रक**

प्रभावी आणि लोकाभिमुख प्रशासन व्यवस्थेसाठी प्रत्येक अधिकारी आणि कर्मचारी यांनी कार्यालयात वेळेवर उपस्थित राहाण्याविषयी व उशिराने उपस्थित होणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांच्याबाबत योग्य ती कारवाई करावी याबाबत शासनाने सूचना दिलेल्या आहेत. तथापि, क्षेत्रिय स्तरावरील अधिकारी/कर्मचारी कार्यालयात उपस्थित झाल्यानंतर त्यांच्या जागेवर नसल्याचेही आढळून आले आहे. त्यामुळे शासकीय कामकाजाचा जलदगतीने निपटारा होत नसल्याने सामान्य जनतेची कामे होत नाहीत. त्याबाबत जनतेकडून शासनाकडे सतत तक्रारी प्राप्त होत असतात. तरी याबाबत सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी आणि तहसिलदार यांना याद्वारे सूचना देण्यात येत आहेत की, त्यांच्या नियंत्रणाखालील शासकीय अधिकारी/कर्मचारी कार्यालयात सकाळी वेळेवर उपस्थित राहतात किंवा नाही, तसेच ते त्यानंतर त्यांच्या जागेवर असतात किंवा नाही याबाबत तपासणी करण्यासाठी एक दक्षता पथक स्थापन करावे. तसेच उपरोक्त स्थापन करण्यात आलेल्या दक्षता पथकाने प्रत्येक महिन्यात अचानक भेट देऊन उपरोक्त बाबीची तपासणी करावी आणि त्याबाबतचा अहवाल वरिष्ठ अधिकाऱ्यांस सादर करावा, असे शासन परिपत्रक समक्रमांक दिनांक १८ ऑगस्ट, २००८ अन्वये कळविण्यात आले आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधिन दिनांक ३ नोव्हेंबर, २००८ च्या शासन परिपत्रकानुसार शासकीय कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांची वेळेवर न येण्याची प्रवृत्ती कमी करण्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांनी शासकीय कार्यालयांना अचानक भेटी द्याव्यात, असे सूचित करण्यात आलेले आहे. अशा भेटींमधून पुरेशा समर्थनाशिवाय आढळून आलेल्या अनियमिततांबाबत आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित विभाग/कार्यालय प्रमुखांना द्याव्यात असे सूचित करण्यात आले आहे. याबाबतही जिल्हाधिकारी यांचे स्तरावर कार्यवाही करण्यात यावी.

सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २००८११२६१६४४५८००१ असा आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी
शाखा:-
आवक नं.:-
6 DEC 2008
विशेष नोंद वही नं.:-
कार्य विवरण नं.:-
प्र. लि. जिल्हाधिकारी

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(अ.से. धांडे)**

उप सचिव

महसूल व वन विभाग

**प्रति,**

सर्व विभागीय आयुक्त

सर्व जिल्हाधिकारी (त्यांनी सदर परिपत्रक त्यांच्या नियंत्रणाखालील अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणावे.)